आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१७ मे २०२४ - शुक्रवार

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मुंबईत शिवाजी पार्क इथं मुंबईतल्या महायुतीच्या उमेदवारांसाठी आयोजित प्रचार सभेला संबोधित करतील. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यासह मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि इतर ज्येष्ठ नेते या सभेला उपस्थित राहण्याची शक्यता आहे. मुंबईत सहा लोकसभा मतदारसंघात येत्या सोमवारी मतदान होणार आहे. दरम्यान सकाळी १० ते मध्यरात्रीपर्यंत वाहतूक निर्बंध लागू केले आहेत, अशी माहिती मुंबई वाहतूक पोलिसांनी दिली आहे. २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पाचव्या टप्प्यासाठी प्रचार शिगेला पोचला आहे.

**<><><><><>**

मुंबईतील वांद्रे-कुर्ला परिसरात इंडीया आघाडीची रॅली आयोजित केली आहे. कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, ज्येष्ठ नेते शरद पवार, उद्धव ठाकरे आणि भारत आघाडीचे इतर नेते या रॅलीला संबोधित करतील. लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी येत्या २० मे रोजी मतदान होणार आहे. या टप्प्यात राज्यातल्या धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे तसंच मुंबईतल्या सहा मतदारसंघांचा समावेश आहे. या सर्व मतदारसंघात प्रचार उद्या संपत असून, सर्वच राजकीय पक्षांचे नेते सभा, बैठका, पदयात्रा काढून जोरदार प्रचार करत आहेत.

**<><><><><>**

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी काल धुळे जिल्ह्यात मतदानाच्या तयारीचा आढावा घेतला. २० मे रोजी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्रांवर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याचे, तसंच दिव्यांग आणि ज्येष्ठ मतदारांसाठी रॅम्प आणि व्हीलचेअर्स पुरवण्याचे निर्देश त्यांनी संबंधित

अधिकाऱ्यांना दिले. नव्या मतदारांची ओळखपत्रं आणि मतपत्रिकांचं वाटप तातडीने करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

<><><><><>

नायगाव - जुईचंद्र असा नवा बायपास तयार करून बोरीवली, कोकण रेल्वे मार्गाला जोडण्याच्या कामाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या निर्देशानुसार मंजुरी दिल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज कांदिवली इथं झालेल्या कोकणवासियांच्या मेळाव्यात दिली. हार्बर मार्ग बोरिवलीला जोडण्याच्या आणि वंदे भारत मेट्रो ट्रेन सुरू करण्याच्या कामांनाही मंजुरी दिल्याचं वैष्णव यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

राज्यात खरीप हंगामासाठी पुरेसा खतांचा साठा उपलब्ध असून, कृषी विभागानं यंदा ४४ लाख ५६ हजार टन रासायनिक खतांचा साठा मंजूर केला आहे. मे महिन्याच्या सुरुवातीपर्यंत राज्यात २९ लाख १९ हजार टन खतांचा साठा होता. उर्वरित खतांचा पुरवठा केंद्राकडून होणार आहे. खतांच्या विक्रीमध्ये काळाबाजार किंवा अन्य गैरप्रकार होत असल्याचं आढळल्यास संपर्क साधण्याचं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

<><><><><>

गडचिरोलीचे जिल्हाधिकारी संजय दैने यांनी आज जलजीवन मिशन कार्यक्रमा अंतर्गत  जिल्ह्यातल्या पाणीपुरवठा योजनांच्या प्रगतीचा त्यांनी आढावा घेतला, आणि पाणीपुरवठ्याची कामं  मुदतीमध्ये पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. गडचिरोली

जिल्ह्यात १ हजार ८२ मंजूर पाणीपूरवठा योजनांपैकी ९२९ योजनांची कामं पूर्ण झाली असून, १५३ कामं प्रगतिपथावर असल्याची माहिती त्यांना यावेळी देण्यात आली.

<><><><><>

राज्यात अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे सुमारे साडेपाच हजार हेक्टरवरील शेती आणि फळपिकांचं नुकसान झालं, तसंच १९ जिल्ह्यातल्या उन्हाळी पिकं आणि फळबागांना फटका बसला आहे. गोंदिया, भंडारा, नाशिक जिल्हयात सर्वाधिक नुकसान झालं असल्याचं कृषी विभागाच्या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. अवकाळी पाऊस अजूनही सुरूच असल्यामुळे नुकसानीचा आकडा वाढण्याचा अंदाज कृषी विभागानं व्यक्त केला आहे.

<><><><><>

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी आज सोसाट्याचा वारा आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. दक्षिण मध्य महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी वादळ, गारपीट आणि सोसाट्याचा वारा वाहील आणि मुसळधार पाऊस पडेल असा अंदाज आहे. मुंबई आणि परिसरात आज वातावरण अंशतः ढगाळ असून, कमाल तापमान ३६ अंश, तर किमान तापमान २७ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील आणि संध्याकाळी हलक्या स्वरूपाचा पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

<><><><><>

नंदुरबार जिल्ह्यातल्या अक्कलकुवा तालुक्यातल्या खापर इथल्या एका एजन्सीतून राज्यात बंदी असलेल्या एच टी बी टी बियाण्याच्यी १६१ पाकिटं जप्त करण्यात आली. संबंधित दुकानदाराने ही पाकिटं गुजरातमधून विक्रीसाठी

आणल्याच्या गोपनीय माहितीच्या आधारे कृषी विभागाने दुकानावर धाड टाकून तपासणी केली आणि जवळपास अडीच लाख रुपयांची बियाणं जप्त केली. या प्रकरणी अक्कलकुवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

//<><><><><>//